एक रहस्य... एक शाप...
आणि अंधाराचा अंत नसलेला प्रवास...

# आडाच्या तळाशी



दिपक सदाकळे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# आडाच्या तळाशी

## रहस्य-भयकादंबरी

**दिपक सदाकळे**

# आडाच्या तळाशी(रहस्य-भयकादंबरी)

## लेखक:

दिपक दगडू सदाकळे

मु. पो. आरवडे, ता. तासगांव,

जि. सांगली – ४१६३१२

मोबाइल : +91 9421006005

ई-मेल : sadakale.deepak@gmail.com

## मुखपृष्ठ- दिपक सदाकळे

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : ८ सप्टेंबर २०२६

ISBN :978-93-5943-524-4

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. १५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- दिपक दगडू सदाकळे- 9421006005)

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय

## दिपक दगडू सदाकळे

शिक्षण : बी.ए. इंग्रजी (BA English)

साहित्याची सुरुवात : दहावी परीक्षा दिल्यानंतर मोकळ्या वेळेत डॉ. साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांची फकीर ही कादंबरी वाचली. त्या क्षणापासून लेखन आणि वाचन याबाबत मनात ओढ निर्माण झाली.

प्रेरणास्थान : डॉ. अण्णा भाऊ साठे त्यांनी ग्रामीण जीवन, कामगार वर्ग व शोषितांचे दुःख अत्यंत प्रभावीपणे मांडले. त्यांचं कार्यच माझं साहित्यिक प्रेरणास्थान ठरलं.

आवड : ग्रामीण जीवनावर आधारित कथा व साहित्य लिहिणे. गावाकडच्या माणसांचे सुख-दुःख, संस्कृती, परंपरा, संघर्ष व भावभावना यांचे वास्तव चित्रण करणं हे लेखनामधील मुख्य उद्दिष्ट आहे.

साहित्यिक शैली : ग्रामीण बोलीभाषेचा वापर, साधी व सरळ भाषाशैली, अनुभवांवर आधारित लेखन, जीवनाच्या तळागाळातील सत्य सांगण्याचा प्रयत्न.

आवडते लेखक :- डॉ. अण्णा भाऊ साठे, पु.ल.देशपांडे, व्यंकटेश माडगुळकर, ग.दि. माडगुळकर, वि.वा.शिरवाडकर, प्र.के अत्रे, वि. स. खांडेकर, राम गणेश गडकरी.

माझा पहिला प्रकाशित काव्यसंग्रह "उजेडाच्या शोधात" हा आहे. त्या काव्यसंग्रहातून समाजातील वेदना, संघर्ष, आशा आणि परिवर्तनाची आस शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला. वाचकांकडून मिळालेल्या प्रेम आणि प्रोत्साहनामुळेच कादंबरी लेखनाकडे वळण्याचं धैर्य मिळालं.

"आडाच्या तळाशी" ही माझी रहस्य-भयप्रधान कादंबरी आहे. ही कथा केवळ अलौकिक घटनांची नाही; ती भीती, मौन, अपराधभाव, लोकविश्वास आणि मानवी मनातील अंधाऱ्या कोपऱ्यांचा शोध घेणारी आहे. या कादंबरीतून वाचकांना थरारासोबत विचार करायलाही भाग पाडावं, हा माझा प्रयत्न आहे.

लेखन ही माझ्यासाठी केवळ अभिव्यक्ती नाही, तर समाज, माणसं आणि त्यांच्या अनुभवांशी जोडून राहण्याचा एक प्रामाणिक मार्ग आहे. पुढील काळातही विविध साहित्यप्रकारांतून अर्थपूर्ण आणि दर्जेदार लेखन वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा माझा प्रयत्न कायम राहील.




**कव्हरवर क्लिक करताच पुस्तक उघडेल**

अर्पणपत्रिका:

" माझ्या प्रत्येक वाचकाला...

ज्यांच्या प्रेमामुळे

माझ्या लेखणीला नवी ताकद मिळत राहते,

आणि ज्यांच्या मनात

माझ्या शब्दांना एक छोटंसं घर मिळतं.

ही कादंबरी सस्नेह अर्पण.."

# मनोगत

काही कथा आपण लिहित नाही.

त्या आपल्याला लिहायला भाग पाडतात.

"आडाच्या तळाशी" ही केवळ भयकादंबरी नाही. ती भीती, अपराध, अंधश्रद्धा, मौन आणि मानवी मनाच्या अंधाऱ्या कोपऱ्यांचा शोध घेणारा प्रवास आहे.

ग्रामीण भागात वाढताना अनेक आख्यायिका, गूढ आड, स्मशान, जुन्या वाड्यांच्या कथा आणि रात्रीच्या कुजबुजीतून जन्मलेल्या दंतकथा ऐकायला मिळाल्या. त्या कथांमध्ये भूतांपेक्षा माणसांच्या मनात दडलेली भीती अधिक मोठी होती. त्या अनुभवांनी या कादंबरीचं बीज रुजवलं.

या कथेतला अंधार हा फक्त आडात नाही. तो माणसांच्या मनात आहे. काही वेळा आपण लपवलेल्या सत्यात आहे. काही वेळा आपण गप्प राहिलेल्या अन्यायात आहे.

ही कथा लिहिताना माझा प्रयत्न फक्त वाचकाला घाबरवण्याचा नव्हता, तर प्रत्येक पानानंतर त्याच्या मनात एक प्रश्न निर्माण करण्याचा होता.

खरा अंधार नेमका कुठे असतो?

या प्रवासात साथ दिलेल्या माझ्या कुटुंबीयांचे, मित्रांचे आणि प्रत्येक वाचकाचे मनःपूर्वक आभार.

आपल्या प्रतिक्रिया, सूचना आणि प्रेम हीच माझ्या लेखनाची खरी प्रेरणा आहे.

# अस्विकरण

“आडाच्या तळाशी” ही कादंबरी पूर्णतः काल्पनिक कथा आहे. या कथेतील सर्व घटना, प्रसंग, पात्रे, स्थळे, नावे आणि कथानक हे लेखकाच्या कल्पनेतून साकारलेले आहेत.

या कथेचा कोणत्याही जीवित अथवा मृत व्यक्तीशी, वास्तविक घटना, संस्था किंवा स्थळाशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध नाही. कथेमध्ये आढळणारे कोणतेही साम्य हे निव्वळ योगायोग समजावा.

या कादंबरीतील भय, रहस्य, अंधश्रद्धा आणि अलौकिक प्रसंग हे केवळ साहित्यिक कल्पनेचा भाग आहेत. त्यांचा उद्देश कोणत्याही व्यक्ती, समाज, श्रद्धा किंवा परंपरेचा अवमान करणे हा नाही.

ही कथा केवळ मनोरंजन आणि साहित्यिक अनुभवासाठी आहे.

# अनुक्रमणिका

भाग १ : मध्यरात्रीची हाक

भाग २ : गणेश परत आला

भाग ३ : वीस वर्षांपूर्वीची मुलगी

भाग ४ : आडाखालील दरवाजा

भाग ५ : जमिनीखालचे आवाज

भाग ६ : अनोळखी

भाग ७ : काळा महाराज

भाग ८ : सावल्यांचे शहर

भाग ९ : रक्षक

भाग १० : गावावरची रात्र

भाग ११ : सत्याची किंमत

भाग १२ : अंतिम दार

उपसंहार : गावची आख्यायिका

# भाग १ : मध्यरात्रीची हाक

पावसाने त्या रात्री गावाला ला अक्षरशः वेढा घातला होता. ओढा, गावातल्या गटारी भरून वाहत होते. आकाश काळ्या ढगांनी भरून गेले होते. चमकत्या विजेच्या उजेडानी क्षणाक्षणाला गावाचे रूप बदलत होते. कधी झोपलेल्या राक्षसासारखे,तर कधी एखाद्या शापित अवशेषासारखे सगळा गांव अंधारात होता.

रात्रीचे दहा वाजून गेले होते आमवस्या होती त्यात शनिवार होता त्यामुळे गावातील प्रत्येक घराचे दरवाजे बंद होते. खिडक्या घट्ट लावलेल्या होत्या. चुली विझल्या होत्या. अधून मधून कुत्री भुकत होती. पण गावातील माणसांचे आवाज एकदम थांबले होते. कारण गाव गावामध्ये एक नियम होता. एक असा नियम, ज्यामागचे कारण कोणी विचारत नसे. आणि ज्याचे उत्तर कोणी देत नसे.

गावात कोणाला लागीर लागली की घरातली माणसं डॉक्टर च्या आधी देवाचं नाव घेत. मग कुणीतरी म्हातारी बाई म्हणायची, “उतारा टाका... नाहीतर ही बाधा वाढत जाईल. ”

काहीजण म्हणत होते की, दर अमावस्येच्या रात्री, शनिवारी आडाकडे उतारे टाकतात. त्यात लिंबू, मिरच्या, मीठ, हळद-कुंकू आणि नारळ, असे वेगवेगळे आणि विचित्र उतारे दिसायचे.

पण हे उतारे नेमके कुणासाठी असायचे, हे मात्र कुणालाच माहीत नव्हतं. सकाळी आडाच्या वाटेने जाणाऱ्या माणसाला कधी लिंबू दिसायचा, कधी काळ्या दोऱ्याची गुंडाळी, तर कधी नारळ फुटलेला दिसायचा. कुणी

त्याला हात लावायचं नाही.  पायाने चुकून जरी धक्का लागला तरी माणूस चार पावलं मागे व्हायचा.

पण गावातल्या जुन्या माणसांना एक गोष्ट माहीत होती.

हे उतारे आडाच्या वाटेवर कालपासून पडलेले नव्हते. ते वर्षानुवर्षे तिथे पडत होते.

आणि प्रत्येक अमावस्येनंतर दुसऱ्या दिवशी ते दिसायचे.

एकदा जनू काकांनी धाडस करून पहाटेच आडाकडे जाऊन पाहिलं होतं. मागच्या रात्री टाकलेला उतारा तिथे नव्हता.  लिंबू नव्हता, मिरच्या नव्हत्या, नारळही नव्हता.

फक्त ओल्या मातीवर दोन अनोळखी पावलांचे ठसे होते.

आडापासून बाहेरच्या दिशेने नाही...

तर आडाच्या काठापासून **आडाच्या आतल्या बाजूला जाणारे.**

जनू काका बराच वेळ त्या ठशांकडे पाहत राहिले.

मग त्यांनी आडात डोकावलं.

खाली काळोख होता.

पण त्या काळोखातून मंद कुजक्या वासाची एक झुळूक वर आली. आणि अंगावर अचानक काटा आला. जनू काका दोन पावलं मागे सरकले.

त्या दिवसापासून त्यांनी कधीही अमावस्येच्या रात्री आडाकडे जाण्याची हिंमत केली नाही.

कारण गावात एक कुजबुज होती...

**उतारा टाकणारे लोक आडाजवळ जातात,**
**पण परत कधीच येत नाहीत.**

"मध्यरात्रीनंतर काळ्या आडाच्या दिशेने जायचे पण नाही आणि तिकडे पाहायचे नाही."

हा नियम गावातल्या लेकरांपासून म्हाताऱ्यांपर्यंत सगळे पाळत होते.

भीतीपोटी.

की अनुभवापोटी...

हे मात्र कुणालाच ठाऊक नव्हते.

पण त्या रात्री...

सोळा वर्षांचा गणेश हा नियम मोडणार होता.

"आई, मी जरा बाहेर जाऊन येतो."

स्वयंपाकघरात भांडी आवरत असलेल्या सोनाबाईं मागे वळून पाहिले.

"आता? या वेळी?"

"मित्रांकडे जातो. दहा मिनिटांत येतो."

"गण्या, बाहेर पाऊस किती आहे बघितलंस का?"

पण तोपर्यंत गणेशने अंगावर जाकीट चढवले होते.

त्याच्या चेहऱ्यावर किशोरवयीन बेफिकीरीचे हसू होते.

गावातल्या जुन्या गोष्टींवर त्याचा कधीच विश्वास नव्हता.

भुतं, शाप, आत्मे...

हे सगळं त्याला म्हाताऱ्या लोकांच्या गप्पा वाटायचं.

सोनाबाईं ना उत्तर देण्याचीही उसंत न देता तो बाहेर पडला.

थंडगार पावसाचे थेंब त्याच्या अंगावर कोसळू लागले.

गावाच्या अरुंद वाटा ओलांडत तो हळूहळू गावाच्या ओड्याच्या दिशेने निघाला.

आणि काही वेळातच...

तो त्या जागी पोहोचला.

काळा आड.

शेकडो वर्षांची.

शेवाळाने माखलेली.

अंधाराच्या मध्यभागी उभी असलेली.

गावातील वृद्धांच्या मते त्या आडाचा तळ कोणीच पाहिला नव्हता.

आणि ज्यांनी पाहण्याचा प्रयत्न केला...

ते कधी पूर्वीसारखे परतले नव्हते.

गणेशच्या ओठांवर उपहासपूर्ण हसू उमटले.

"लोकही ना... काहीही सांगतात."

तो आडाच्या कठड्यावर चढला.

आणि खाली डोकावला.

खाली फक्त अंधार होता.

घट्ट.

जिवंत.

श्वास घेणारा अंधार.

क्षणभर त्यालाही अस्वस्थ वाटले.

पण पुढच्याच क्षणी त्याने स्वतःला सावरले.

तेव्हाच...

त्याच्या कानावर एक आवाज आला.

एक स्त्री रडत होती.

अतिशय मंद.

अतिशय खोल.

जणू पृथ्वीच्या पोटातून.

"मला... बाहेर काढ..."

गणेशचा श्वास अडकला.

तो सावधपणे पुढे झुकला.

पुन्हा तोच आवाज.

यावेळी अधिक स्पष्ट.

अधिक जवळ.

"मला... बाहेर काढ..."

गणेशचा घसा कोरडा पडला.

पावसाचे थेंब आता अधिक वेगाने कोसळत होते. विजेचा एक झोत आकाशात चमकून गेला आणि क्षणभर काळ्या आडाचा कठडा उजळून निघाला.

"कोण आहे तिथे?" त्याने धाडस एकवटून विचारले.

काही क्षण उत्तर आले नाही.

फक्त पावसाचा आवाज.

आणि आडाच्या खोल तळाशी उसळणारी भयाण शांतता.

गणेश आणखी थोडा पुढे झुकला.

तेव्हाच...

खाली कुठेतरी हालचाल झाली.

आणि एक आवाज पुन्हा वर आला.

यावेळी तो स्त्रीचा नव्हता.

तो जणू अनेक आवाज एकत्र मिसळून तयार झाला होता.

खोल.

ओला.

आणि अस्वाभाविक.

"तुझी आई..."

गणेशच्या छातीत धडधड वाढली.

क्षणभर त्याच्या मेंदूने विचार करणेच थांबवले.

आई?

त्याची आई तर घरी होती.

मग हा आवाज कोणाचा?

त्याने घाईघाईने मोबाईल खिशातून काढला आणि टॉर्च सुरू केली.

पिवळसर प्रकाशाचा झोत आडाच्या काळोखात उतरला.

खाली काळे पाणी होते.

स्थिर.

निश्चल.

जणू आरशासारखे.

गणेशने सुटकेचा निःश्वास सोडला.

"वेडेपणा आहे सगळा..."

तो स्वतःशीच पुटपुटला.

मात्र त्याचे वाक्य पूर्ण होण्याआधीच पाण्याच्या पृष्ठभागावर लहरी उठल्या.

एक...

दोन...

तीन...

आणि अचानक...

त्या काळ्या पाण्यात दोन पांढरे डोळे उघडले.

ते डोळे मानवी नव्हते.

त्यात जीवन नव्हते.

पण मृत्यूही नव्हता.

ते फक्त त्याच्याकडे पाहत होते.

न हलता.

न मिचकावता.

सरळ त्याच्या आत्म्यापर्यंत पोहोचणाऱ्या नजरेने.

गणेशच्या तोंडातून किंकाळी बाहेर पडली.

तो मागे सरकण्याचा प्रयत्न करू लागला.

पण भीतीमुळे त्याचे शरीरच ऐकत नव्हते.

विजेचा आणखी एक कडकडाट झाला.

आणि त्या उजेडात त्याला असं वाटलं की ते डोळे आता अधिक जवळ आले होते.

अधिक मोठे.

अधिक जिवंत.

त्याचा तोल गेला.

क्षणभर त्याचे हात हवेत फडफडले.

कठड्यावरील शेवाळामुळे त्याचा पाय घसरला.

आणि पुढच्याच क्षणी...

तो अंधारात कोसळला.

त्याच्या किंकाळीचा आवाज पावसाच्या प्रचंड गडगडाटात विरून गेला.

मग पुन्हा सगळं शांत झालं.

जणू काहीच घडलं नव्हतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी गाव जागं झालं.

पण गणेश घरी परतला नव्हता.

सुरुवातीला सोनाबाई ना वाटलं तो एखाद्या मित्राकडे झोपला असेल.

मात्र सकाळ सरली.

दुपार झाली.

तरी गणेशचा पत्ता नव्हता.

गावभर शोधाशोध सुरू झाली.

शेतं पालथी घातली गेली.

ओढा,वगळी तपासल्या गेल्या .

सगळ्या शिवारात माणसं पाठवली गेली.

पण गणेश कुठेच सापडला नाही.

त्याचा मोबाईल नाही.

चप्पल नाही.

मृतदेह नाही.

काहीच नाही.

जणू तो रात्रीच्या अंधाराने गिळून टाकला होता.

संध्याकाळपर्यंत गावात कुजबुज सुरू झाली.

म्हातारे लोक एकमेकांकडे अर्थपूर्ण नजरेने पाहू लागले.

स्त्रियांनी लेकरांना घराबाहेर जाण्यास मनाई केली.

आणि काहींच्या ओठांवर एकच वाक्य पुन्हा पुन्हा उमटत राहिलं

"पुन्हा सुरुवात झाली..."

"ती जागी झाली..."

"यावेळी कोणाचा नंबर आहे?"

पण हे शब्द कोणी मोठ्याने बोलत नव्हते.

कारण गावा ला अजूनही वीस वर्षांपूर्वीच्या त्या रात्रीची भीती वाटत होती.

त्या रात्रीची...

जिचा उल्लेख करणेही गावात बंदी होते.

*गणेश परतला*

रात्र अजूनही संपलेली नव्हती.

पाऊस तसाच कोसळत होता.

कौलांवर आदळणाऱ्या थेंबांचा आवाज आणि अधूनमधून आकाश फाडणारी विजेची चमक याशिवाय साऱ्या गावात मृत शांततेची चादर पसरली होती.

सोनाबाई मात्र झोपू शकत नव्हत्या.

गणेश सकाळपासून बेपत्ता होता.

संपूर्ण गाव शोधून झाले होते.

पण मुलाचा कुठेच मागमूस नव्हता.

मनात भीतीचे असंख्य विचार उसळत होते.

तेव्हाच...

घराच्या ओसरीत कोणीतरी चालत असल्याचा आवाज आला.

टक...

टक...

टक...

ओल्या पावलांचा.

जणू पावसातून भिजत आलेली एखादी व्यक्ती घराभोवती फेर धरत होती.

सोनाबाईं च्या अंगावर शहारा उठला.

त्या हळूच उठल्या.

कंदील पेटवला.

थरथरणाऱ्या हातांनी तो उचलला आणि दरवाज्याकडे पाहू लागल्या.

क्षणभर काहीच दिसले नाही.

मग विजेचा झोत चमकला.

आणि मातीच्या जमिनीवर उमटलेले पाण्याचे ठसे त्यांना दिसले.

ते ठसे बाहेरून आत आले होते.

पण दरवाजा तर आतून बंद होता.

सोनाबाईं च्या छातीत धडधड वाढली.

कापऱ्या हातांनी त्यांनी कडी उघडली.

दार किरकिरत उघडले.

आणि पुढच्याच क्षणी त्यांच्या तोंडून किंकाळी बाहेर पडता पडता राहिली.

दारासमोर गणेश उभा होता.

पूर्ण भिजलेला.

अंगावरून पाणी टपटपत होते.

केस चेहऱ्यावर चिकटले होते.

पण सर्वात विचित्र गोष्ट म्हणजे...

तो हलत नव्हता.

श्वास घेत असल्याचेही जाणवत नव्हते.

तो फक्त उभा होता.

जणू कोणीतरी त्याला तिथे आणून ठेवले होते.

"ग... गण्या?"

सोनाबाईं च्या तोंडून कसाबसा आवाज बाहेर पडला.

काही क्षण गणेश निश्चल राहिला.

मग त्याच्या ओठांवर हळूहळू हसू उमटू लागले.
ते हसू त्याच्या चेहऱ्यावर शोभत नव्हते.
आईला ओळखून आनंद झालेल्या मुलाचे ते हसू नव्हते.
ते काहीतरी वेगळे होते.
काहीतरी थंड.
निर्जीव.
अस्वस्थ करणारे.
सोनाबाईं च्या अंगातील रक्त गोठू लागले.
कारण त्यांचा मुलगा जरी समोर उभा असला...
तरी त्याच्यात काहीतरी बदलले होते.
काहीतरी भयंकर.
मग गणेशने हळूहळू मान वर केली.
कंदिलाचा प्रकाश त्याच्या चेहऱ्यावर पडला.
आणि सोनाबाईं च्या हातातील कंदील जवळजवळ खाली पडला.
कारण...
त्याच्या डोळ्यांच्या जागी डोळे नव्हते.
तिथे दोन काळे, अथांग खोलगट खड्डे होते.
जणू कुणीतरी त्याच्या डोळ्यांसकट आत्माही उपटून नेली होती.
सोनाबाईं ना ओरडायचे होते.
पळून जायचे होते.
पण भीतीने त्यांचे शरीर दगडासारखे जड झाले होते.

गणेश हळूहळू पुढे आला.

त्याच्या प्रत्येक पावलाबरोबर जमिनीवर ओल्या चिखलाचे ठसे उमटत होते.

पण त्या पाण्याचा रंग काळा होता.

असामान्य.

जणू आडाच्या तळातील अंधारच त्याच्यासोबत आला होता.

तो अगदी आईसमोर येऊन थांबला.

काही क्षण त्याने न हलता तिच्याकडे पाहिले.

किंवा...

पाहत असल्यासारखे वाटले.

मग त्याच्या ओठांतून आवाज बाहेर पडला.

तो गणेशचा आवाज नव्हता.

तो खोल होता.

ओलसर होता.

आणि जणू आडाच्या तळातून प्रतिध्वनीत होत होता.

"आई..."

सोनाबाईं च्या डोळ्यांत पाणी आले.

शेवटी आई ती आईच असते,

"गण्या... कुठे होतास रे?"

गणेशच्या ओठांवर पुन्हा तेच भेसूर हसू उमटले.

मग त्याने हळूहळू कुजबुजले

"आई..."

"आडाच्या तळाशी..."

तो थांबला.

बाहेर विजेचा प्रचंड कडकडाट झाला.

आणि पुढच्याच क्षणी त्याने शब्द उच्चारले

"आडाच्या तळाशी अजून कोणी तरी जिवंत आहे."

ते वाक्य हवेत विरताच घरातील कंदील स्वतःहून विझला.

आणि काळोखाने सगळ्यांना गिळून टाकले.

# भाग २ : गणेश परतला

कंदील विझला.

क्षणात घर काळ्याकुट्ट अंधारात बुडाले.

सोनाबाईं ना स्वतःचा श्वासही ऐकू येत नव्हता.

बाहेर पाऊस कोसळत होता.

आत भीती.

आणि त्या दोघांच्या मध्ये...

गणेश.

किंवा गणेशसारखं दिसणारं काहीतरी.

"गण्या..."

सोनाबाईं नी थरथरत्या आवाजात हाक मारली.

उत्तर आलं नाही.

अंधार अधिक दाट होत गेला.

मग अचानक...

त्यांच्या कानाजवळ कुणीतरी कुजबुजलं.

"आई..."

सोनाबाई किंचाळल्या.

त्या मागे सरकल्या.

पण तिथे कोणीच नव्हतं.

गणेश अजूनही दाराजवळ उभा होता.

त्याच जागी.
त्याच अवस्थेत.
जणू तो हललाच नव्हता.
मग त्यांच्या लक्षात आलं...
आवाज त्याच्या तोंडातून आला नव्हता.
तो घराच्या वेगवेगळ्या कोपऱ्यांतून येत होता.
कधी छतावरून.
कधी भिंतीतून.
कधी जमिनीखालून.
"आई..."
"आई..."
"आई..."
एकच शब्द.
पण अनेक आवाज.
सोनाबाई जरी घाबरली असली तरी ती गाण्याचा च विचार करत होती.
म्हणतात ना आई सारखं,आई इतकं फक्त आईच करू शकते तसेच.
सोनाबाईं च्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.
"तू माझा गण्या आहेस ना?"
क्षणभर शांतता पसरली.
मग गणेश हळूहळू हसू लागला.
ते हसू वाढत गेलं.

मोठं होत गेलं.
आणि काही क्षणांतच ते घरभर घुमू लागलं.
जणू शेकडो लोक एकत्र हसत होते.
सोनाबाईं नी कान झाकले.
पण आवाज थांबत नव्हता.
अचानक...
हसू थांबलं.
पूर्ण शांतता.
मग गणेश बोलला.
"त्यांना अंधार आवडत नाही."
सोनाबाई स्तब्ध झाल्या.
"कोणाला?"
गणेशने उत्तर दिलं नाही.
तो हळूहळू घरात शिरला.
त्याच्या ओल्या पावलांचे ठसे जमिनीवर उमटत होते.
पण ते पाण्याचे नव्हते.
ते काळसर रक्ताचे होते.
सोनाबाईं ची नजर त्या ठशांवर गेली.
आणि त्यांचा जीव दचकला.
कारण प्रत्येक ठशाच्या मध्यभागी एक विचित्र चिन्ह उमटलेलं होतं.
एक वर्तुळ.

आणि त्याच्या मध्यभागी...

आडासारखा काळा ठिपका.

गणेश आपल्या खोलीकडे निघाला.

पण खोलीत जाण्याआधी तो थांबला.

हळूहळू मागे वळला.

आणि पहिल्यांदाच त्याच्या चेहऱ्यावर दुःख दिसलं.

खरं दुःख.

जणू कुठेतरी आत खोलवर खरा गणेश अजून जिवंत होता.

"आई..."

तो कुजबुजला.

"मला खाली जाऊ द्यायला नको होतं."

सोनाबाईं चे डोळे भरून आले.

"गण्या..."

"तो अजूनही तिथे आहे."

"कोण?"

गणेशचे ओठ थरथरले.

त्याच्या डोळ्यांच्या काळ्या खाचांमधून अचानक काळसर पाणी वाहू लागलं.

आणि तो कुजबुजला

"जो स्वप्नांमध्ये आधी येतो..."

"आणि नंतर माणसांमध्ये."

तेवढ्यात घराच्या मागच्या भिंतीवर धाडकन काहीतरी आदळलं.

धाड!

मग पुन्हा.

धाड!

धाड!

धाड!

जणू बाहेर कुणीतरी भिंतीवर मुठी मारत होतं.

सोनाबाई घाबरून खिडकीकडे वळल्या.

बाहेर कोणीच नव्हतं.

फक्त पाऊस.

आणि अंधार.

पण चिखलात काहीतरी दिसत होतं.

अनेक पावलांचे ठसे.

लहान.

मोठे.

वृद्धांचे.

मुलांचे.

स्त्रियांचे.

शेकडो.

आणि ते सर्व...

घराच्या दिशेने येत होते.

सोनाबाईं चा घसा कोरडा पडला.
कारण त्या पावलांच्या टोकाशी कोणतीही माणसं नव्हती.
फक्त ठसे होते.
जणू अदृश्य लोक चालत होते.
तेवढ्यात गणेशच्या खोलीतून एक किंकाळी आली.
असह्य.
अमानवी.
सोनाबाई धावत आत गेल्या.
आणि जे दृश्य त्यांनी पाहिलं...
त्यामुळे त्यांचा आत्माच हादरला.
गणेश भिंतीवर चिकटला होता.
जणू कुणीतरी अदृश्य शक्तीने त्याला हवेत उचललं होतं.
त्याचं शरीर तडफडत होतं.
आणि भिंतीवर रक्ताने एकच वाक्य लिहिलं जात होतं
"ती अजून आडात नाही..."

# भाग ३ : वीस वर्षांपूर्वीची मुलगी

रात्र सरली होती.

पण गावचा अंधार अजून हटला नव्हता.

सकाळचा सूर्य उगवला होता, तरी गावातील प्रत्येक चेहरा फिकट दिसत होता.

कारण रात्रीची घटना आता संपूर्ण गावात पसरली होती.

गणेश परत आला होता.

पण तो पूर्वीसारखा नव्हता.

आणि त्याच्या घराच्या भिंतीवर रक्ताने लिहिलेलं ते वाक्य...

"ती अजून आडात नाही..."

हे ऐकताच गावातील काही वृद्धांचे चेहरे पांढरे पडले होते.

त्यांनी एकमेकांकडे पाहिलं.

जणू एखादं पुरलेलं रहस्य पुन्हा श्वास घेऊ लागलं होतं.

त्या सकाळी गावाच्या चौकात लोक जमले होते.

कोणी उघडपणे बोलत नव्हतं.

पण प्रत्येकाच्या नजरेत एकच प्रश्न होता.

"ती परत आली आहे का?"

गावातील सर्वांत वृद्ध माणूस हरिभाऊ वडाच्या झाडाखाली बसला होता.

त्याच्या थरथरणाऱ्या हातात जपमाळ होती.

पण ओठांवर मंत्र नव्हते.

फक्त एकच नाव होतं.

"नयना..."

अचानक त्याच्या हातातून जपमाळ खाली पडली.

कारण गर्दीत त्याला एक चेहरा दिसला.

एक मुलगी.

पांढरा ड्रेस.

ओले केस.

आणि अनवाणी पाय.

ती गर्दीच्या टोकाला उभी होती.

शांत.

निश्चल.

हरिभाऊंचा श्वास अडकला.

कारण तो चेहरा त्याने आधीही पाहिला होता.

वीस वर्षांपूर्वी.

त्या रात्री.

त्या आडजवळ.

त्याने पुन्हा नीट पाहिलं.

पण पुढच्याच क्षणी ती मुलगी अदृश्य झाली.

जणू ती तिथे कधी होतीच नाही.

दुपारी गणेश पुन्हा गायब झाला.

सोनाबाईं नी सगळीकडे शोध घेतला.

शेवटी तो काळ्या आडाजवळ सापडला.
तो कठड्यावर बसला होता.
पाय हवेत सोडून.
जणू कुणाशी तरी बोलत होता.
"गण्या!"
सोनाबाई ओरडल्या.
गणेशने हळूहळू मान वळवली.
त्याच्या काळ्या डोळ्यांच्या खाचांमध्ये पावसाचं पाणी साचलं होतं.
"ती दुःखी आहे."
तो शांतपणे म्हणाला.
"कोण?"
"नयना."
सोनाबाईं च्या छातीत धस्स झालं.
हे नाव त्यांनी कित्येक वर्षांत ऐकलं नव्हतं.
गावात कोणी घेतही नव्हतं.
"तुला हे नाव कुठून कळलं?"
गणेश काही क्षण शांत राहिला.
मग आडकडे बोट दाखवत म्हणाला
"ती खाली रडते."
"रोज."
"रात्रभर."

"आणि म्हणते..."

त्याचा आवाज अचानक बदलला.

तो मुलाचा राहिला नाही.

तो एका मुलीचा झाला.

आर्त.

तुटलेला.

वेदनांनी भरलेला.

"बाबा... मला घरी न्यायला ये..."

सोनाबाईं च्या पायाखालची जमीन सरकली.

त्या घाबरून मागे सरकल्या.

आणि त्याच क्षणी आडातून थंड वाऱ्याचा झोत वर आला.

जणू कुणीतरी खोल अंधारात श्वास घेत होता.

त्या रात्री हरिभाऊंना झोप लागली नाही.

मध्यरात्रीच्या सुमारास त्यांच्या घराचा दरवाजा आपोआप उघडला.

कर्कश आवाज करत.

हळूहळू.

हरिभाऊ उठून बसले.

घरात कोणी नव्हतं.

पण बाहेरच्या अंगणात चिखलात पावलांचे ठसे दिसत होते.

लहान मुलीचे.

अनवाणी.

ते ठसे घरातून बाहेर जात होते.

हरिभाऊ नकळत त्यांच्यामागे निघाले.

एक.

दोन.

तीन.

अनेक वळणे घेत.

ते ठसे त्यांना गावाच्या टोकापर्यंत घेऊन गेले.

आणि शेवटी...

काळ्या आडपाशी थांबले.

पावसाने भिजलेल्या कठड्यावर एक आकृती बसली होती.

पांढरा ड्रेस.

लांब केस.

अनवाणी पाय.

हरिभाऊंच्या डोळ्यांत अश्रू आले.

त्यांचा आवाज थरथरला.

"नयना...?"

आकृतीने हळूहळू मान वळवली.

वीज चमकली.

आणि क्षणभर तिचा चेहरा उजळला.

ती नयनाच होती.

जशी वीस वर्षांपूर्वी होती.

तशीच.
एक दिवसही मोठी न झालेली.
पण तिच्या डोळ्यांत निरागसता नव्हती.
तिथे फक्त दुःख होतं.
आणि अथांग राग.
ती काही क्षण हरिभाऊंकडे पाहत राहिली.
मग शांतपणे म्हणाली
"बाबा..."
हरिभाऊंच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.
"मुली..."
"मी अजून तिथेच आहे."
"कुठे?"
नयनाने हळूहळू आडकडे बोट दाखवलं.
मग कुजबुजली
"जिथे तुम्ही मला सोडलं होतं."
आणि पुढच्याच क्षणी...
ती आकृती विरघळू लागली.
धुक्यासारखी.
पावसात मिसळून.
अंधारात हरवून.
मात्र ती पूर्ण नाहीशी होण्याआधी एक वाक्य हवेत तरंगत राहिलं

"बाबा... त्याला जागं करू नका..."
हरिभाऊ गारठून गेले होते तसेच उभे राहिले.
कारण त्याच क्षणी...
आडाच्या तळातून एक प्रचंड गर्जना ऐकू आली.
आणि काळ्या पाण्याच्या पृष्ठभागावर...
दोन लाल डोळे उघडले.

# भाग ४ : आडाखालील दरवाजा

त्या दोन लाल डोळ्यांनी हरिभाऊंकडे पाहिलं.

फक्त काही क्षण.

पण त्या काही क्षणांत हरिभाऊंना वीस वर्षांचा भूतकाळ पुन्हा जगावा लागला.

नयनाची किंकाळी.

गावकऱ्यांचे चेहरे.

मंत्रोच्चार.

आणि स्वतःची असहाय्यता.

हरिभाऊ दचकून मागे सरकले.

त्यांच्या पायाखालील चिखल उडाला.

पण ते डोळे मात्र तिथेच होते.

काळ्या पाण्याच्या तळाशी.

न हलणारे.

न मिचकावणारे.

फक्त पाहणारे.

मग अचानक...

पाण्याचा पृष्ठभाग हलू लागला.

सुरुवातीला हलके.

नंतर अधिक वेगाने.

जणू आडाच्या तळाशी एखादे प्रचंड हृदय धडधडत होते.

धड...

धड...

धड...

प्रत्येक ठोक्याबरोबर आडाच्या भिंती थरथरू लागल्या.

हरिभाऊंनी घाबरून मागे पाहिलं.

आणि त्यांच्या अंगावर काटा आला.

कारण आडाच्या कठड्यावर कोरडी माती नव्हती.

तिथे ताज्या हातांचे ठसे उमटले होते.

लहान मुलांचे.

स्त्रियांचे.

वृद्धांचे.

शेकडो.

जणू कुणीतरी आतून वर येण्याचा प्रयत्न करत होतं.

मग...

एक हात पाण्यातून बाहेर आला.

पांढराफटक.

विचित्र लांब बोटांचा.

हरिभाऊंच्या छातीत धस्स झालं.

कारण तो हात नयनाचा नव्हता.

तो माणसाचाही नव्हता.

त्याला सहा बोटं होती.
आणि प्रत्येक बोटाच्या टोकावर...
एक डोळा.
जिवंत.
उघडा.
पाहणारा.
हरिभाऊंच्या तोंडून किंकाळी फुटली.
त्याच क्षणी आकाशात वीज कडाडली.
आणि संपूर्ण आड उजळून निघाली.
क्षणभर.
फक्त एका क्षणासाठी.
हरिभाऊंना आडाच्या आत काहीतरी दिसलं.
एक दगडी भिंत.
एक गुप्त बोगदा.
आणि त्या बोगद्याच्या शेवटी...
लोखंडाचा एक प्रचंड दरवाजा.
गंजलेला.
जुनाट.
शेकडो विचित्र चिन्हांनी भरलेला.
मग वीज नाहीशी झाली.
सगळं पुन्हा अंधारात बुडालं.

दुसऱ्या दिवशी सकाळी.
आरवड्यात एक अनोळखी आला.
उंच.
सडपातळ.
खांद्यावर बॅग.
डोळ्यांत अस्वस्थ जिज्ञासा.
त्याचं नाव होतं
अद्वैत देशमुख.
पुण्यातील पत्रकार.
त्याने अनेक गुन्हे, अपघात आणि रहस्यमय घटनांवर लेख लिहिले होते.
पण गावा बद्दल ऐकलेली गोष्ट वेगळीच होती.
कारण त्याला काही दिवसांपूर्वी एक पत्र मिळालं होतं.
पाठवणाऱ्याचं नाव नव्हतं.
पत्ता नव्हता
फक्त एक ओळ होती
"जर सत्य शोधायचं असेल, तर काळ्या आडात डोकाव."
आणि त्या पत्रात एक जुना फोटो होता.
फोटोत सात-आठ गावकरी उभे होते.
आणि त्यांच्या मधोमध...
एक बारा वर्षांची मुलगी.
हसरी.

निरागस.
तिच्या फोटोखाली लिहिलं होतं
नयना
तारीख
२३ जुलै २००६
अद्वैतने तो फोटो पुन्हा एकदा पाहिला.
मग गावाकडे नजर टाकली.
आणि त्याला पहिलीच गोष्ट जाणवली.
गावातील लोक त्याच्याकडे पाहत होते.
विचित्र नजरेने.
भीतीने.
संशयाने.
जणू त्यांना माहिती होतं
तो इथे का आला आहे.
त्या संध्याकाळी.
सूर्य मावळत असताना.
अद्वैत पहिल्यांदा काळ्या आडपाशी पोहोचला.
आकाश ढगांनी भरलं होतं.
वारा थंड झाला होता.
आणि वातावरणात एक अज्ञात दडपण होतं.
तो सावधपणे कठड्याजवळ गेला.

खाली पाहिलं.

सुरुवातीला त्याला काहीच दिसलं नाही.

फक्त अंधार.

अथांग अंधार.

पण मग...

त्याने टॉर्चचा प्रकाश खाली सोडला.

आणि त्याचा श्वास अडकला.

कारण आडाच्या भिंतीत...

अर्ध्या उंचीवर...

एक दरवाजा होता.

लाकडी.

जुनाट.

कुजलेला.

जणू कुणीतरी आडाच्या आतच एक खोली बांधली होती.

अद्वैत आणखी पुढे झुकला.

टॉर्चचा प्रकाश दरवाजावर पडला.

आणि त्याला त्यावर कोरलेली अक्षरे दिसली

"जे पुरलं गेलं, ते मेलं नाही."

अद्वैतच्या अंगावर शहारा उठला.

आणि त्याच क्षणी...

दरवाजासमोर कुणीतरी उभं राहिलं.

एक मुलगी.
पांढरा ड्रेस.
लांब काळे केस.
चेहरा खाली.
अद्वैतचा श्वास रोखला गेला.
कारण ती हळूहळू मान वर करू लागली...

# भाग ५ : जमिनीखालचे आवाज

ती मुलगी हळूहळू मान वर करू लागली.
अद्वैतचा श्वास रोखला गेला.
टॉर्चचा प्रकाश तिच्या चेहऱ्यावर पडला.
आणि क्षणभर त्याच्या अंगातील रक्त गोठलं.
कारण तो चेहरा त्याने आधी पाहिला होता.
त्या जुन्या फोटोत.
वीस वर्षांपूर्वीच्या छायाचित्रात.
ती नयना होती.
अगदी तशीच.
वेळेने न स्पर्श केलेली.
पण काहीतरी वेगळं होतं.
तिचे डोळे पूर्ण काळे होते.
आणि तिच्या ओठांवर जाड काळ्या दोऱ्याने शिवण घातलेली होती.
जणू कुणीतरी तिचा आवाज कायमचा बंद करण्याचा प्रयत्न केला होता.
अद्वैत काही क्षण स्तब्ध उभा राहिला.
मग धाडस करून कुजबुजला
"नयना...?"
मुलगी हलली नाही.
फक्त तिचा उजवा हात वर आला.

आणि आडाच्या अधिक खोल अंधाराकडे बोट दाखवू लागला.
टॉर्चचा प्रकाश त्या दिशेने गेला.
खाली...
खूप खाली...
त्याला काहीतरी दिसलं.
एक अरुंद दगडी पायऱ्यांचा मार्ग.
जो आडाच्या भिंतीतून खाली उतरून जात होता.
तो मार्ग आधी तिथे नव्हता.
किंवा...
कोणालाच कधी दिसला नव्हता.
मग अचानक नयना अदृश्य झाली.
जणू ती धुक्याची बनलेली होती.
अद्वैतने घाबरून मागे पाऊल टाकलं.
पण पत्रकार म्हणून त्याच्या मनातली जिज्ञासा भीतीपेक्षा मोठी होती.
त्याने मोबाईल काढला.
रेकॉर्डिंग सुरू केलं.
आणि त्या पायऱ्यांवर पाऊल ठेवलं.
जसे जसे तो खाली उतरू लागला...
तसा वरचा जगाचा आवाज कमी होत गेला.
पावसाचा आवाज नाहीसा झाला.
वाऱ्याचा आवाज नाहीसा झाला.

आणि काही वेळानंतर...

फक्त त्याच्या पावलांचा आवाज उरला.

टप...

टप...

टप...

दगडी पायऱ्यांवर पडणाऱ्या पाण्याच्या थेंबांचा.

काही मिनिटांनी पायऱ्या संपल्या.

समोर एक अरुंद बोगदा होता.

हवा कुबट होती.

ओलसर होती.

आणि विचित्रपणे जिवंत वाटत होती.

जणू त्या अंधारालाच श्वास होता.

अद्वैतने टॉर्च पुढे केली.

भिंतींवर विचित्र खुणा होत्या.

शेकडो नखांच्या ओरखड्यांसारख्या.

काही ठिकाणी रक्ताने काढलेली चिन्हे.

काही ठिकाणी...

हातांचे ठसे.

लहान मुलांचे.

स्त्रियांचे.

आणि एका भिंतीवर तर शेकडो वेळा एकच शब्द लिहिलेला होता

"बाहेर..."

"बाहेर..."

"बाहेर..."

अद्वैतच्या मणक्यातून थंड शिरशिरी गेली.

मग...

त्याला आवाज ऐकू आला.

सुरुवातीला मंद.

जणू वाऱ्याची सळसळ.

पण नंतर तो स्पष्ट होत गेला.

कुणीतरी रडत होतं.

मग दुसरा आवाज.

कुणीतरी कुजबुजत होतं.

मग तिसरा.

मग चौथा.

आणि काही क्षणांत...

संपूर्ण बोगदा आवाजांनी भरून गेला.

शेकडो.

हजारो.

अदृश्य आवाज.

"मला घरी जायचंय..."

"मला वाचवा..."

"तो येतोय..."

"दार बंद करा..."

अद्वैतने कान झाकले.

पण आवाज थांबत नव्हते.

ते थेट त्याच्या डोक्यात घुमत होते.

मग अचानक...

सगळे आवाज शांत झाले.

एकदम.

पूर्ण.

भयाण शांतता.

अद्वैत थांबला.

आणि त्याच क्षणी त्याच्या टॉर्चचा प्रकाश एका मोठ्या खोलीवर पडला.

तो थिजून उभा राहिला.

कारण खोलीच्या मध्यभागी...

एक प्रचंड लोखंडी दरवाजा उभा होता.

तो इतका मोठा होता की त्याच्या उंचीचा अंदाजही येत नव्हता.

संपूर्ण दरवाजावर गंज चढला होता.

आणि त्यावर शेकडो विचित्र चिन्हं कोरलेली होती.

पण सर्वात भयानक गोष्ट ती नव्हती.

भयानक गोष्ट म्हणजे...

दरवाजाच्या खालच्या फटीतून काहीतरी बाहेर येत होतं.

काळा धूर.

जिवंत.

हलणारा.

श्वास घेणारा.

अद्वैतची नजर त्या धुरावर खिळली.

आणि त्याच क्षणी...

धुराच्या आत दोन लाल डोळे उघडले.

तेच डोळे.

जे हरिभाऊंनी आडात पाहिले होते.

जे वीस वर्षांपासून अंधारात जागे होते.

आणि मग...

पहिल्यांदाच तो आवाज घुमला.

खोल.

जड.

अमानवी.

जणू हजारो मृत लोक एकाच वेळी बोलत होते.

"अखेर..."

क्षणभर शांतता.

मग पुन्हा

"अखेर कोणीतरी माझ्यापर्यंत पोहोचलं."

अद्वैतच्या हातातील टॉर्च थरथरू लागली.

त्याचा श्वास अडकला.

आणि त्या लाल डोळ्यांनी हसल्यासारखं वाटलं.

"सांग..."

तो आवाज पुन्हा घुमला.

"तू सत्य शोधायला आला आहेस..."

"की स्वतःला हरवायला...?"

# भाग ६ : अनोळखी

त्या लाल डोळ्यांकडे पाहताच अद्वैतला जाणवलं...

तो त्या गुहेत उभा नव्हता.

तो स्वतःच्या मनाच्या एखाद्या अंधाऱ्या कोपऱ्यात उभा होता.

त्याच्या भोवतीचा अंधार जिवंत झाला होता.

भिंती धूसर होऊ लागल्या.

जमीन विरघळू लागली.

आणि त्याच्या डोळ्यांसमोर एकामागून एक दृश्यं उभी राहू लागली.

एक लहान मुलगा.

रस्त्याच्या कडेला रडणारा.

एक वृद्ध स्त्री.

एकटी.

अंधाऱ्या खोलीत मरताना.

एक माणूस.

स्वतःच्या अपराधाने तुटलेला.

एक आई.

हरवलेल्या मुलासाठी रडणारी.

अद्वैतचा श्वास जड झाला.

"हे काय आहे?"

तो ओरडला.

आणि त्याच क्षणी तो आवाज पुन्हा घुमला.
"ही माझी भूक आहे..."
गुहा थरथरली.
"मी शरीर खात नाही."
"मी रक्त पित नाही."
"मी माणसांच्या भीतीवर जगतो."
अद्वैतच्या छातीत धडधड वाढली.
कारण त्या आवाजात राग नव्हता.
द्वेष नव्हता.
फक्त एक भयावह शांतता होती.
जणू एखादं सत्य बोलत होतं.
"तू कोण आहेस?"
अद्वैतने विचारलं.
काही क्षण शांतता पसरली.
मग लाल डोळे आणखी तेजस्वी झाले.
"लोकांनी मला अनेक नावं दिली."
"राक्षस."
"भूत."
"शाप."
"अंधार."
"पण..."

गुहेतील काळा धूर हळूहळू आकार घेऊ लागला.
"मी यापैकी काहीच नाही."
अद्वैत थिजून उभा राहिला.
कारण त्या धुरातून बाहेर येणारा चेहरा...
मानवी नव्हता.
तो शेकडो चेहऱ्यांचा बनला होता.
रडणारे.
किंचाळणारे.
घाबरलेले.
वेडे झालेले.
आणि त्या प्रत्येक चेहऱ्यामागे एकच भावना होती.
भीती.
"मी जन्मलो..."
तो आवाज घुमला.
"ज्या दिवशी पहिल्या माणसाने अंधाराला घाबरायला सुरुवात केली."
क्षणभर अद्वैतला वाटलं त्याच्या पायाखालची जमीन नाहीशी झाली.
कारण त्या क्षणी त्याला समजलं.
हा एखादा जीव नव्हता.
ही एखादी आत्मा नव्हती.
ही एक कल्पना होती.
मानवजातीच्या भीतीतून जन्मलेली.

आणि भीतीतूनच जगणारी.

अचानक...

गुहेत एका मुलीची किंकाळी घुमली.

"अद्वैत!"

तो दचकून मागे वळला.

नयना.

ती दरवाज्याच्या दुसऱ्या टोकाला उभी होती.

तिचा चेहरा भयाने पांढरा पडला होता.

